क्र. पोउपा/शवाशा/प्रशा-१/ ८६ /२०२२
पो. उपायुक्त शहर वाहतुक शाखा यांचे कार्यालय,
ठाणे. दि. ३/१०/२०२२

## वाहतूक नियंत्रण अधिसुचना – सुधारणा

**विषय :–** अधिसुचनेमध्ये सुधारणा होणेबाबत.

**संदर्भ :–** १) OW/DCP TRAFFIC THANE/CP-THANE/NOTIFICATION/66/2018, १०/०९/२०१८

*******

**ज्याअर्थी,** ठाणे शहर वाहतूक विभागाचे कार्यक्षेत्रात दिनांक २६/०९/२०२२ ते दिनांक ०५/१०/२०२२ या कालावधीत नवरात्रोत्सव हा सण साजरा होत असून दिनांक ०५/१०/२०२२ रोजी देवीमूर्ती विसर्जनाचे व मिरवणूकांचे मोठया प्रमाणात आयोजन करण्यात आले आहे. सदर सणानिमित्त जनसमुदाय रस्त्यावर असतो.

**ज्याअर्थी,** महाराष्ट्र शासनाकडून कोरोना रोगाच्या प्रादुर्भावाचे वेळी लावण्यात आलेले निर्बंध हटविण्यात आल्याने मोठया प्रमाणात जनसमुदाय देवी विसर्जन व मिरवणुकांमध्ये सामील होणार आहे. जड – अवजड वाहतूक सुरू ठेवण्यात आली त्या दरम्यान देवी मूर्ती स्थापना किंवा विसर्जन होण्यापुर्वी काही अप्रिय घटना घडू शकते.

**ज्याअर्थी,** ठाणे शहर वाहतूक विभागातून तीन राष्ट्रीय महामार्ग व एक राज्य महामार्ग मार्गस्थ होत आहेत. नमूद महामार्गावरून बाहेरील राज्यांमध्ये जाणा–या व बाहेरील राज्यांतून येणा–या वाहनांची वाहतूक सुरू असते. जड – अवजड वाहनांमुळे ठाणे शहर वाहतूक विभागाच्या कार्यक्षेत्रामध्ये नवरात्रौत्सव दरम्यान वाहतूक कोंडी होईल. त्या अनुषंगाने प्रतिबंधात्मक उपाययोजना म्हणून ठाणे शहर वाहतूक विभागातील अंतर्गत मार्गावर जड – अवजड वाहनांना प्रवेश बंदी बाबत आदेश काढणे आवश्यक असले बाबत माझी खात्री झालेली आहे.

**त्याअर्थी,** मी जय जीत सिंह, पोलीस आयुक्त, ठाणे शहर, महाराष्ट्र शासन, गृह विभाग क्र. एम.व्ही.ए. –११६/सीआर/३७/टीआर, दि. २७/०९/१९९६ चे अधिसुचनेनुसार मोटार वाहन कायदा कलम ११५, ११६ (१) अन्वये मला प्राप्त झालेल्या अधिकाराचा वापर करून यापुर्वीचे अधिसुचना क्र. OW/DCP TRAFFIC THANE/CP-THANE/NOTIFICATION/66/2018, १०/०९/२०१८ मध्ये खालीलप्रमाणे सुधारणा करीत आहे.

**प्रवेश बंद –** सर्व प्रकारच्या जड – अवजड मालवाहतूक करणा–या सर्व प्रकारच्या वाहनांना ठाणे शहर पोलीस आयुक्तालयाचे सर्व शहरांचे मार्गावरून मार्गस्थ होण्यास देवी विसर्जन/ मिरवणुक दिवशी दिनांक ०५/१०/२०२२ रोजी दुपारी १४:०० ते देवी मूर्ती विसर्जन मिरवणूक संपेपर्यंत प्रवेश बंद राहील.

3.x.22

( जय जीत सिंह )
पोलीस आयुक्त, ठाणे शहर.

**प्रति,**

संचालक, शासकीय मुद्रण व लेखन सामुग्री, चर्नी रोड, मुंबई.
२/– आपणास विनंती करण्यात येते की, वरील संदर्भीय वाहतूक अधिसुचना सुधारणा केले बाबत तसेच माल वाहतूक करणाऱ्या सर्व प्रकारच्या वाहनांचे मार्गक्रमणाकरीता जारी करण्यात आलेलया वेळेबाबत राजपत्रात प्रसिध्दी देण्यात यावी.

**प्रत,**

जिल्हा माहिती अधिकारी, जिल्हा माहिती अधिकारी कार्यालय, ठाणे.
२/– वरील संदर्भीय वाहतूक अधिसुचना रद्द केले बाबत तसेच माल वाहतूक करणाऱ्या सर्व प्रकारच्या वाहनांचे मार्गक्रमणाकरीता जारी करण्यात आलेलया वेळेबाबत राजपत्रात प्रसिध्दी देण्यात यावी.

CS CamScanner

**प्रत मा. सविनय सादर,**
जिल्हाधिकारी, ठाणे, पालघर व रायगड जिल्हा.
अपर पोलीस महासंचालक (कायदा व सुव्यवस्था), मुंबई.
अपर पोलीस महासंचालक (वाहतुक), महाराष्ट्र राज्य, मुंबई.
पोलीस आयुक्त, ठाणे शहर, नवी मुंबई.
विशेष पोलीस महानिरीक्षक, कोकण परिक्षेत्र, नवी मुंबई.

**प्रत आवश्यक कार्यवाहीसाठी,**
अपर पोलीस आयुक्त, पुर्व प्रादेशिक विभाग/पश्चिम प्रादेशिक विभाग, कल्याण व ठाणे,
पोलीस अधीक्षक, ठाणे ग्रामीण, पालघर व नवी मुंबई.
पोलीस अधीक्षक, रस्ता सुरक्षा महामार्ग, ठाणे.
पोलीस उप आयुक्त, वाहतूक विभाग, ठाणे, नवी मुंबई व मिरा भाईंदर
पोलीस उप आयुक्त, विषेश शाखा,ठाणे शहर
पोलीस उप आयुक्त, परिमंडळ– १,२,३,४, ठाणे शहर

प्रत :– आयुक्त ठाणे, भिवंडी निजामपूर शहर, कल्याण डोंबिवली व उल्हासनगर महानगरपालिका.
मुख्याधिकारी, अंबरनाथ व कुळगाव बदलापूर नगर परिषद.

प्रत :– मुख्य व्यवस्थापक (वाहतूक), जे.एन.पी.टी. न्हावाशेवा, नवी मुंबई.

प्रत :– स्विय सहायक, मा. पालकमंत्री, जिल्हा ठाणे.

प्रत :– पोलीस उप आयुक्त, आर्थिक गुन्हे, ठाणे शहर.
२/– सदरची अधिसुचना नागरिकांच्या माहितीसाठी ठाणे शहर पोलीस वेबसाईटवर प्रसिध्दीसाठी.

प्रत :– समन्वय अधिकारी, ९ ए.एस.कक्ष, ठाणे.
२/– सदरची अधिसुचना रद्द करण्यात आले बाबत नोटीस मध्ये प्रसिध्दीसाठी.

प्रत :– सर्व संबंधित वाहतूक संघटना.

CamScanner